(चाल : कोण जाणे काय ते नशीबात आहे.)

# प्रासंगिक गीत

## निभविले गुरु वचनाला

निभवीले गुरू वचनाला, गुरू सेवकानी.
छातीवरी झेलली गोळी चाचा प्रतापानी. ||धृ||

चाचाजी वदले गुरूजी, ऐसा वर द्यावा.
तुमचे पहीले माझा नश्वर, देह सुटावा.
वर देता सत्य ठरली, सदगुरूची वाणी. ||१||
छातीवरी झेलली गोळी चाचा प्रतापानी...

बलिदान गुरू शिष्याचे, व्यर्थ ना गेले.
अवघ्या मानव मात्राला एकत्रित केले.
अजरामर जाहले ऐसे बलिदानी. ||२||
छातीवरी झेलली गोळी चाचा प्रतापानी...

दिला बोध व्यर्थ कुणाचे, सांडो ना रक्त.
मानवी नसा नसात वहावे हे फक्त.
रक्त दानाची पटविली, महती तयांनी. ||३||
छातीवरी झेलली गोळी चाचा प्रतापानी...

धन्य गुरूबचन धन्य, चाचा प्रताप.
एकनाथा या विश्वाचे ठरले मायबाप.
एकतेची त्यांनी ठेवीली निशाणी. ||४||
छातीवरी झेलली गोळी चाचा प्रतापानी...

गीतकार- एकनाथ कांबळे.

Indrabal